


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : २९५ वा    शुक्रवार दि ०६ फेब्रुवारी २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# बुलढाणा जिल्ह्यात पूजा खेडकर आहेत तरी किती?

## तपासणी प्रमाणपत्राची नव्हे तर दिव्यांग कर्मचाऱ्यांची व्हावी!

### जिल्हा रुग्णालयांतर्गत दिले जाताहेत बोगस प्रमाणपत्र ?

**जनसंचलन/बुलढाणा**

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन प्रत्येक क्षेत्रात कर्मचारी आपला उल्लू सरळ करत आहेत.हे पाप मात्र जिल्हा सामान्य रुग्णालयातील दिव्यांग बोर्ड करत असल्याचा आरोप खुलेआम केला जात आहे. जिल्ह्यात पूजा खेडकर आहेत तरी किती? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला असून,याकडे लोकप्रतिनिधीसह वरिष्ठ अधिकारी ढुंकूनही पाहायला तयार नाहीत.कर्तव्यदक्ष दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव यांच्या पत्रामुळे राज्यात व जिल्ह्यात अर्थपूर्ण कुंभकर्णी झोपेत असलेले शासकीय विभाग यांनी कारवाईस सुरुवात केली पण खरी तपासणी प्रमाणपत्राची नव्हे तर दिव्यांग कर्मचाऱ्यांची व्हावी आणि त्यानंतर यंत्रणेतील अधिकाऱ्यांना सस्पेंड करण्यात येण्याची मागणी जोर धरू लागली आहे.शिक्षकांची उदाहरण घेऊया! नोकरीला लागताना दिव्यांग कोट्यातून भरती झालेले कमी आहेत.परंतु बोगस दिव्यांग शिक्षक अधिक पाहायला मिळतात.बदली प्रमोशन, निवडणूक कार्यातून सवलती, ड्युटी मध्ये वेळेत शिथिलता, इन्कम टॅक्स मध्ये सूट, इत्यादी साठी बुलढाणा, मेहकर,चिखली व अन्य




**दिव्यांग / अस्तिव्यंग बोगस प्रमाणपत्र प्रकरणातील देणारे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्याची चल अचल संपत्तीची चौकशी करण्याची तक्रारकर्त्यांची मागणी**

तालुक्यातील अनेक धड धाकट शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी बाबू यांनी बुलढाणा सरकारी रुग्णालयातून पैसे मोजून बोगस प्रमाणपत्र घेऊन लाभ लाटण्याचा आरोप करण्यात येत आहे.

त्यामुळे इतर शिक्षकांवर अन्याय होतेय. यातील काही प्रमोशन घेऊन निवृत्त सुद्धा झालेत.मागील वर्षामध्ये लोकांनी ऑनड्युटी कुठलीही सुट्टी न घेता काहींनी दबाव तंत्र, व आपले कू-कौशल्य पणाला लावून शाळेवर हजर राहून बुलढाणा येथील तपासणी केल्याचे दाखवून प्रमाणपत्र मिळविले. त्यांना प्रमाणपत्र मिळाल्याचे तारीख -वर्ष व त्या वर्षातील उपस्थिती हजेरी मस्टर माहिती अधिकाराने बोलावून शहानिशा केल्यास अनेक सज्जन आढळून येतील. खरोखर दिव्यांग असलेल्या बांधवांना लोकांना मात्र अनेक वेळा बुलढाणा सरकारी रुग्णालयाच्या अनेक वाऱ्या करून सुद्धा वर्षानुवर्ष प्रमाणपत्र मिळत नसल्याची खंत आहे.मात्र पैसे दिले की बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळतात. त्यामुळे तपासणी प्रमाणपत्राची नाही तर तपासणी दिव्यांग कर्मचाऱ्यांची व्हायला पाहिजे.जिल्हा परिषद या सर्व बाबींना दोषी आहे असाही आरोप केला जात आहे.जिल्हा परिषदेने अर्थपूर्ण नियोजन करून ही बाब टाळाल्याचे म्हटले जात आहे.

अजून बरेच काही पुढील भागात..

---

# पल्सरवर आले अन् पोत हिसकावून पसार!

## मलकापूर पोलिसांना केले खुलं आव्हान

**जनसंचलन/मलकापूर**

शहरात चोरट्यांचा धुमाकूळ वाढत असून भरदिवसा महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना ३ फेब्रुवारी रोजी घडली. अर्बन बँक कॉलनी परिसरात राहणाऱ्या व नगर परिषद मराठी प्राथमिक शाळेतील शिक्षिका सौ.मेघा देशमुख या सायंकाळी शाळा सुटल्यानंतर पायी घरी जात असताना जनता कॉलेजच्या मागे समर्थ डेअरीसमोर दोन अज्ञात इसमांनी पल्सर मोटारसायकलवरून येत त्यांच्या गळ्यातील अंदाजे २८ हजार रुपये किमतीची सोन्याची पोत हिसकावून नेली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महिलेच्या आरडाओरडीनंतर स्थानिक नागरिकांनी चोरट्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपी फरार झाले. विशेष म्हणजे ही पोत शिक्षिकेने स्वतःच्या पगारातून थोडी-थोडी रक्कम साठवून बनविल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे शहरातील कायदा-



सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्न उपस्थित होत असून पोलिसांनी गस्त वाढवून आरोपींना तातडीने अटक करावी, अशी नागरिकांची जोरदार मागणी आहे. मलकापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार सुनील राऊत करीत आहेत.

# थकीत महसूल व गौण खनिज दंड वसुलीसाठी प्रशासनाची आक्रमक मोहीम; जप्तीपर्यंत कारवाईचा इशारा!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील प्रलंबित जमीन महसूल, विविध कर व गौण खनिज दंडाची १०० टक्के वसुली करण्यासाठी प्रशासनाने आता कडक भूमिका घेतली आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी महसूल यंत्रणेला स्पष्ट निर्देश देत अवैध गौण खनिज उपसा करणाऱ्यांवर आक्रमक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट मालमत्ता जप्तीपर्यंत कठोर पावले उचलली जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. महसूल विभागातील तलाठी व मंडळ अधिकारी गावोगावी जाऊन थकीत वसुली मोहीम राबवणार



असून वारंवार सूचना देऊनही दंड व महसूल न भरणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. तहसीलदारांना कठोर कारवाईचे पूर्ण अधिकार देण्यात आल्याने प्रशासनाची मोहीम अधिक वेगाने राबवली जाणार आहे. दरम्यान, नागरिकांनी दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी थकीत जमीन महसूल, कर व गौण खनिज दंड तात्काळ भरावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# आकडे नकोत, उद्योगच हवेत!



जगाचे लक्ष वेधणाऱ्या दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्र सरकारने केलेल्या तीस लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांची चर्चा एव्हाना राज्यभरात सुरू झाली आहे. गुंतवणुकीचा हा आकडा गेल्या वर्षीपेक्षा दुप्पट असल्याने त्याचा साग्रसंगीत गाजावाजा होणे साहजिकच. जिल्हा परिषदांचा अपवाद वगळता राज्यात एवढ्यात कोणत्या निवडणुका होणार नसल्या, तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारने त्याचे श्रेय घेण्यास सुरुवात केली आहे. या गुंतवणुकीमुळे चाळीस लाख नवे रोजगार निर्माण होणार असल्याचे सांगत स्वत:ची पाठ थोपटून घेण्याचे काम महायुती सरकार करीत आहे. ङ्गरिकाम्या हाताने गेलेले देवाभाऊ येताना खजिना घेऊन आले,फ अशी ङ्गसोशलफ जाहिरातबाजीही जोमाने सुरू आहे. अनेक करारमदार झाले असल्याने त्याचे ङ्गक्रेडिटफ घेण्याबद्दल कोणाचा आक्षेप असण्याचे कारण नाही. राज्याची अर्थव्यवस्था पुढील चार वर्षांत एक ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अशी महागुंतवणूक आणावीच लागणार आहे. त्यामुळे येत्या दोन-तीन वर्षांत होणाऱ्या दावोस परिषदेतील आकडे आणखी दुप्पट-तिप्पट झाल्यास त्याचेही आश्चर्य वाटायला नको. तसेही ङ्गउदंड जाहल्या घोषणाफ अशी अवस्था असल्याने कोणत्याच घोषणा, दावे आणि आकडेसुद्धा राज्यातील जनतेला नवे राहिलेले नाहीत. वास्तविक करार झाले म्हणजे लगेच उद्योग सुरू झाला, असे होत नाही. सगळेच करार अमलात येतात, असेही नाही. बाहेरील उद्योग वा कंपन्यांनी दाखवलेले ते निव्वळ स्वारस्य असते. त्यासाठीची ती ङ्गटोकन पावतीफ असते. नंतरची प्रक्रिया बरीच मोठी आणि गुंतागुंतीची असते, ज्यात सातत्यपूर्ण प्रयत्न व पाठपुराव्याची आवश्यकता असते. संबंधित उद्योगाचे प्रतिनिधी नियोजित प्रकल्पस्थळी प्रत्यक्ष भेट देत पडताळणी करतात. प्रकल्पासाठी जमीन, परवानग्या, मूलभूत सुविधा, ठरलेल्या सोयी-सवलती न मिळाल्यास ही गुंतवणूक प्रत्यक्षात येत नाही. जागतिक अडथळ्यांसह स्थानिक लोक व पर्यावरणीय आक्षेपांचाही मुद्दा महत्त्वाचा ठरतो असतो. याबाबत कोकणातील बहुचर्चित नाणार रिफायनरी प्रकल्पाचे उदाहरण देता येईल. गेली काही वर्षे कोणत्या ना कोणत्या कारणामुळे हा प्रकल्प चर्चेत आहे. असो. प्रकल्पात अडचणी आल्यास ती गुंतवणूक इतर राज्ये वा देशाबाहेर वळण्याचीही शक्यता असते. म्हणून हे करार केवळ गुंतवणुकीचे ढोबळ आराखडेच असतात. कोणी मागील काही वर्षांतील घोषणा व प्रत्यक्ष गुंतवणुकीचे आकडे मागितल्यास उद्योग अस्तित्वात येण्यासाठी तीन ते चार वर्षे लागतात, अशी सारवासारवही ठरलेली असते. उद्योगमंत्र्यांनी नुकतेच तसे बजावले असल्याने बडे आकडे पाहून हुरळून जाण्याचे काही कारण नाही. राजकीय लाभ मिळविण्यासाठी आकड्यांचा हा खेळ दरवर्षी हमखास खेळला जातो. नंतर अधिक खोलात गेल्यानंतर अवघी दहा-वीस टक्के गुंतवणूक प्रत्यक्षात आल्याचे स्पष्ट होत असते. पंढरीच्या वारीप्रमाणे मुख्यमंत्री, उद्योगमंत्र्यांसह मंत्री, उद्योजक आदींचे मोठे शिष्टमंडळ दावोसला जात असल्याने या आंतरराष्ट्रीय परिषदेतून महाराष्ट्र, आपापला विभाग वा जिल्ह्याला काय मिळाले, याकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या असतात. त्यामुळे गेली तीन-चार दशके मोठ्या प्रकल्पांसाठी आसुसलेल्या उत्तर महाराष्ट्राच्याही आशा यानिमित्ताने पल्लवित झाल्या होत्या. विभागातील पाच जिल्ह्यांत मिळून तीस ते पन्नास हजार कोटींची गुंतवणूक पदरात पडणार असल्याचे दावे सरकारी पातळीवरून केले जात आहेत. नाशिकमधील प्रकल्प वा होऊ घातलेल्या गुंतवणुकीची नेमकी आकडेवारी अद्याप समोर आली नसली, तरी अहिल्यानगर आणि जळगाव-धुळे या जिल्ह्यांना सर्वाधिक पसंती देण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसते. चाळीसगावमध्ये पंधरा हजार कोटींचा ङ्गसाफफ(सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल) प्रकल्प साकारण्याची प्राथमिक बोलणी झाली आहेत. शेती उत्पादनांपासून विमानांचे हरित इंधन निर्माण करण्याच्या या करारावर शिक्कामोर्तब झाल्याचा आनंद आहेच; परंतु त्यासोबत नाशिकच्या तोंडाला पुन्हा पाने पुसली गेल्याची शंका येते. आमदार मंगेश चव्हाण यांच्या पाठपुराव्यामुळे चाळीसगावला हा प्रकल्प येणे शक्य झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील तिन्ही मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकडे कोणत्या प्रकल्पांसाठी आग्रह धरला किंवा पाठपुरावा केला, हे मात्र कळायला मार्ग नाही. येथील राजकीय नेतृत्वासह साऱ्यांचाच रेटा कमी पडल्याचा नेहमीचा प्रत्यय यंदाही येऊ नये म्हणजे मिळवले! सुवर्ण त्रिकोण आणि चतुष्कोनातील नाशिक जिल्ह्याचा औद्योगिक विकास बड्या प्रकल्पांअभावी वर्षानुवर्षे खुंटलेला आहे. कोणीही, कोणत्याही परिषदेत कितीही मोठे आकडे जाहीर करीत असले, तरी येथील शिक्षित तरुणाईला रोजगारासाठी पुणे-मुंबईसह इतर महानगरांत जावे लागत असल्याचे वास्तवसुद्धा कायम आहे. काही वर्षांपूर्वी मंजुरी दिलेले प्रकल्प पुन्हा नवीन वर्षात जोडून आकडे फुगवण्याचे कारस्थान नेहमी घडते आणि त्यात रोजगार उपलब्धीचे नवनवीन दावेही केले जातात. नाशिक दौऱ्यावर येणारे उद्योगमंत्री तर दरखेपेला नवनवीन आकडेवारी उद्योजकांपुढे नेटाने मांडतात. अगदी जाहीर भाषणात उपमुख्यमंत्र्यांना दूरध्वनी करून समस्या मिटल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्षात मात्र भ्रमनिरासच पदरी येत असतो. दिंडोरीतील अक्राळे येथे उभा राहत असलेला ङ्गरिलायन्स लाइफ सायन्सफ्चा ४,२०० कोटींचा औषधनिर्माण प्रकल्प २०२२ मध्ये तत्कालीन मंत्रिमंडळाने मंजूर केला होता. राज्य सरकारने त्याला पुन्हा मंजुरी देऊन नाशिकमध्ये वर्षभरात बारा हजार कोटी रुपयांचे प्रकल्प येऊ घातल्याची घोषणा उद्योगमंत्र्यांनी केली होती. हे केवळ एक उदाहरण. काही महिन्यांपूर्वी धातू उद्योग आणि डिफेन्स कॉरिडॉरची अशीच टूम काढली गेली. प्रत्यक्षात पुढे काय झाले, हे समजायला मार्ग नाही. दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉरमध्ये सहभागाची नाशिकची संधीही हुकवण्यात आली. आता या प्रकल्पातील दुसऱ्या टप्प्यातील सहभागाबाबतही कोणी चकार शब्द काढायला तयार नाही. नव्या उद्योगांचे राहू द्या; पण मधल्या काळात येथील नियोजित प्रकल्प व सामग्रीही इतरत्र पळवून नेण्याचे कारस्थान घडले. वर्षानुवर्षे केवळ निवडणुकांपुरते गोंजारले गेल्याने नाशिकच्या उद्योगवाढीला करकचून ब्रेक लागला आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दादांच्या विमानातून कोणाची उडी? प्रत्यक्षदर्शीचा खळबळजनक दावा, सरपंचांनी सगळं सांगितलं

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाला आठवडा होऊन गेला आहे. २८ जानेवारीच्या सकाळी अजित पवार यांच्या विमानाला बारामतीत अपघात झाला. मुंबईहून बारामतीला जात असताना अजित पवारांचं विमान कोसळलं. या अपघातात विमानातील पाचही जणांचा मृत्यू झाला. अजित पवार जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचार सभांसाठी बारामतीला जात होते. त्यांचं विमान धावपट्टीपासून ५० मीटर दूरवर कोसळलं.अजित पवार यांच्या अपघाती निधनाबद्दल अनेकांनी संशय व्यक्त केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी अपघातानंतर अनेक प्रश्न उपस्थित केले. विमानात ६ जण असल्याचं सांगण्यात आलं. मग प्रत्यक्षात



पाचच जणांचे मृतदेह कसे मिळाले? विमानाचे पायलट वारंवार का बदलण्यात आले? असे प्रश्न मिटकरी यांनी विचारले. शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांनीदेखील विमान अपघाताबद्दल संशय व्यक्त केला. त्यांनी हा विषय थेट संसदेत उपस्थित केला.या अपघाताचे साक्षीदार असलेल्या कल्याण आटोळे यांनी संपूर्ण घटनाक्रम कथन केला. ते गोजूबावी गावचे सरपंच आहेत. 'सकाळी ८.३५ ते ८.४० दरम्यान विमानानं गावाला दोन घिरट्या घातल्या. उतरायच्या वेळी विमान डावीकडे कललं आणि पुढच्या काही सेकंदांत विमान पडलं. आम्ही ते लांबून पाहिलं. त्यानंतर आम्ही सगळेच विमानाच्या दिशेनं धावलो. तेव्हा मोठ्या प्रमाणात धूर होता. पण जाळ जास्त मोठा नव्हता. विमान पुढच्या बाजूला पेटलेलं होतं. मी तिथे पोहोचल्यावर उजव्या बाजूला गेलो आणि निळ्या रंगांची पँट घातलेला एक माणूस मला ३ ते ४ सेकंद उघडलेल्या दरवाज्यात दिसला. केवळ ३ ते ४ सेकंदच तो मला दिसला,' असं आटोळे यांनी सांगितलं.

मी विमानाच्या जवळ उभा होतो. तितक्यात मला आमच्या गावातील एकानं आवाज दिला. त्यानं मला मागे होण्यास सांगितलं. स्फोट होण्याची भीती असल्याचं तो म्हणाला. त्यावेळी मी मागे सरकलो आणि मोठा स्फोट झाला. त्यानंतर विमानाचे तुकडे हवेत उडाले. स्फोट झाल्यावर मी डाव्या बाजूला गेलो. तर २०-२५ फुटांवर दादा पडलेले होते. पण दादांना आम्ही ओळखलं नाही. कारण ते विमान दादांचं आहे, हे आम्हा कोणालाच माहीत नव्हतं. त्याचवेळी किरण दादा गुजर तिथ आले. हे विमान दादांचं आहे आणि हे पडलेले दादा आहेत, असं गुजर यांनी सांगितलं. त्यानंतर गुजर मोठ्यानं रडू लागले. त्यामुळे आम्ही घाबरलो. आम्हाला काही कळेनासं, सुचेनासं झालं, असा घटनाक्रम आटोळे यांनी सांगितला.

## शरद पवार सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी सहयोग सोसायटीत दाखल

**पुणे :** महाराष्ट्राच्या राजकारणातील आताच्या घडीची सर्वात महत्त्वाची बातमी समोर येत आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बारामतीमधील सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी भेटीला गेले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार हे आधी सुनेत्रा पवार यांच्या सहयोग सोसायटी येथील निवासस्थाली पोहोचले. त्यानंतर शरद पवार हे देखील सुनेत्रा पवार यांच्या सहयोग सोसायटी येथील निवासस्थानाच्या दिशेला भेटीसाठी निघाल्याची माहिती समोर आली. शरद पवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेणार असल्याची माहिती समोर आली. या भेटीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार असल्याची माहिती आहे. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर शरद पवार हे पहिल्यांचा त्यांची भेट घेत आहेत. सहयोग सोसायटी येथे कार्यकर्त्यांची मोठी गर्दी जमली आहे.बारामतीत सहयोग सोसायटीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार



आणि सुनेत्रा पवार यांचं निवासस्थान आहे. अजित पवार यांच्या निधन नंतर पवार कुटुंबियांच्या सांत्वनपर भेटीसाठी राज्यासह देशाभरातील अनेक जण सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी येत आहेत. रोहित पवार यांच्यासह त्यांचे आई-वडील हे देखील सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी दाखल झाले आहेत. संपूर्ण पवार कुटुंबिय इथे आले असल्याची माहिती आहे. शरद पवार यांच्यासोबत त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार या देखील सुनेत्रा पवार यांच्या सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी आले आहेत.सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी अजित पवार यांचा मोठा फोटो लावण्यात आला आहे.

## आता विरोधी पक्षनेते पदासाठी रस्सीखेच

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेत महापौर आणि उपमहापौर विराजमान झाल्यानंतर सभागृहात विरोधी पक्षनेते पद कोण भूषवणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. या पदासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू असून या पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी विरोधी पक्षनेते पदावर दावा केला आहे. त्यामुळे या पदाबाबत सस्पेन्स वाढला आहे. राज्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार की नाही, यावरुन दावे-प्रतिदावे सुरु असताना ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी विरोधी पक्षनेतेपदावरून केलेले विधान चर्चेत आहेठाणे महापालिकेत आयुक्त सौरभ राव यांच्या भेटीसाठी आलेल्या प्रधान यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना 'येत्या काळात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणे, हा एक भाग असून ठाणे पालिकेत विरोधी बाकावर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस बसलेले असताना भ्रष्टाचारासारख्या चुकीच्या मुद्द्यांवर आम्ही एकत्र आवाज उठवण्याचे काम करु शकतो. भविष्यात दोन्ही पक्ष एकत्र आल्यास नजीब मुल्ला हे अभ्यासू नगरसेवक आहेत.

## तगडा शिलेदार उतरवणार, आकड्यांचा चमत्कार घडणार?

**मुंबई :** मुंबई महापौर निवडणूक येत्या ११ फेब्रुवारीला मुंबई महापालिका मुख्यालयात होणार आहे. शिवसेना उबाठा पक्षानेही महापौर-उपमहापौर निवडणुकीसाठी उमेदवार देण्याची तयारी सुरू केली आहे. सात फेब्रुवारीला या निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज सादर करण्यासाठी शिवसेना उबाठाचेही महापौर-उपमहापौर उमेदवार येणार असून, त्यांच्यासोबत सर्व नगरसेवकही उपस्थित राहणार आहेत. तसे पक्षाकडून आदेशही देण्यात आले आहेत. मात्र उबाठा पक्षाकडून महापौर-उपमहापौर उमेदवार अर्ज कोण सादर करणार, हे अद्याप गुलदस्त्यात आहे.मुंबई महापालिकेत भाजपचे ८९, शिवसेना उबाठाचे ६५, शिवसेना (शिंदे गट) २९ नगरसेवक आणि मनसे, एमआयएम, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, समाजवादी पक्षाचेही नगरसेवक निवडून आले आहेत. शिवसेना, भाजप, काँग्रेस, एमआयएम, मनसेकडून कोकण भवन आयुक्तांकडे गटनोंदणीही पूर्ण केली आहे. अद्याप राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटनोंदणी पूर्ण झालेली नाही. शिवसेनेला पाठिंबा



म्हणून सहयोगी गट स्थापनही केला जाणार आहे. ही प्रक्रिया गुरुवारपर्यंत पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे. महत्त्वाच्या पक्षांची गटनोंदणी झाल्याने महापौर-उपमहापौर निवडणुकीला वेग आला आहे.भाजपकडून महापौरपदासाठी राजश्री शिरवडकर, अलका केरकर, रितू तावडे यांच्यासह काहींची नावे चर्चेत आहेत. यावर अद्यापही शिक्कामोर्तब झालेले नाही; तर शिवसेनेचा (शिंदे गट) उपमहापौर होणार का, यावरही अद्याप निर्णय नाही. सात फेब्रुवारीला नामनिर्देशन अर्ज सादर करण्याची मुदत असल्याने महायुतीकडून महापौर आणि उपमहापौर कोण, याकडे अनेकांचे लक्ष लागून आहे.

# सुनेत्रा पवार यांना झेड प्लस सुरक्षा व्यवस्था, गृह मंत्रालयाला सूचना, महायुती सरकारची विशेष खबरदारी

**मुंबई :** महाराष्ट्राच्या नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना 'झेड प्लस' दर्जाची सुरक्षा मिळणार आहे. याविषयीचा निर्णय राज्य सरकारने बुधवारी घेतला. याआधी खासदार असताना पवार यांना 'एक्स' दर्जाची सुरक्षा होती. मात्र, उपमुख्यमंत्रिपदी शपथ घेतल्यानंतर पवार यांच्या सुरक्षेची विशेष खबरदारी राज्य सरकारकडून घेण्यात येत आहे.

अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर सुनेत्रा पवार यांना शनिवार, ३१ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्रिपदी शपथ देण्यात आली. पवार यांच्याकडे तीन खातीही सोपविण्यात आली असून,




मंत्रालयात अजित पवार यांच्या वापरातील दालनेही त्यांच्या कार्यालयासाठी मंगळवारी प्रदान करण्यात आली. पुणे आणि बीड हे राज्याच्या राजकारणातील महत्त्वाच्या जिल्ह्यांचे पालकमंत्रिपदही त्यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यानंतर सुनेत्रा पवार यांच्या सुरक्षेचा आढावा राज्य सरकारकडून घेण्यात आला असून, त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सुनेत्रा पवार यांना यापुढे 'झेड प्लस' दर्जाची सुरक्षा मिळणार असून, त्याविषयीच्या सूचना गृह विभागाला देण्यात आल्या आहेत. सुनेत्रा पवार या आठवड्याच्या अखेरीस किंवा पुढील आठवड्यात पदाचा कार्यभार स्वीकारणार असल्याचे समजते.

द,ध,न आणि न+ अशा सरकारकडून देण्यात येणाऱ्या सुरक्षेच्या विविध श्रेणी आहेत. सुरक्षा यंत्रणा वेळोवेळी आढावा घेऊन सुरक्षा व्यवस्थेचा दर्जा ठरवतात. देशभरातील अतिमहत्त्वाच्या पदावरील व्यक्ती, तसेच कट्टरवाद्यांच्या निशाण्यावर असलेल्या महत्त्वाच्या व्यक्तींना सरकारकडून सुरक्षा पुरवली जाते.झेड प्लस सुरक्षा ही डझत्रः नंतर भारतातील दुसरी सर्वोच्चस्तरीय सुरक्षा व्यवस्था आहे. ती प्रामुख्याने व्हीव्हीआयपी, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री किंवा अत्यंत धोका असलेल्या व्यक्तींना दिली. झेड प्लस सुरक्षा व्यवस्थेत एक बूलेटप्रूफ गाडी, २ एस्कॉर्ट गाड्या, अधिकारी आणि ८ जवान मिळून ३० पेक्षा जास्त सुरक्षा कर्मचारी तैनात असतात. या व्यक्ती एखाद्या कार्यक्रमाला जाणार असतील, तर आधीच त्या ठिकाणच्या सुरक्षेची तपासणी केली जाते.

# सॉरी पप्पा...; बिल्डिंगच्या ९ व्या मजल्यावरून उड्या मारल्या, ३ सख्ख्या बहिणींनी आयुष्य संपवलं

**गाझियाबाद :** उत्तर प्रदेशातील गाझियाबादमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तीन अल्पवयीन बहिणींनी इमारतीच्या ९व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. निशिका (वय १६), प्राची (वय १४) आणि पाखी (वय १२) यांनी सामूहिक आत्महत्या केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले असून सदर प्रकरणी तपास सुरु करण्यात आला आहे. गाझियाबादच्या तिला मोड पोलीस स्टेशन परिसरातून ही धक्कादायक घटना समोर आली आहे. भारत सिटी सोसायटीमध्ये राहणाऱ्या तीन अल्पवयीन बहिणींच्या मृत्यूने सर्वांनाच धक्का बसला आहे. हे प्रकरण गेमिंग ॲप व्यसनाचं असल्याचं उघड झालं आहे. पोलिसांनी




घटनास्थळी येऊन तपास सुरू केला आहे.

Ghaziabad मधील तिला मोड येथील भारत सिटी सोसायटीमध्ये रात्री २ वाजताच्या सुमारास, तीनवेळ काहीतरी पडल्याचा आवाज ऐकून लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. तिथे मृतदेह पाहून सर्वांना धक्का बसला. पोलिसांना तात्काळ माहिती देण्यात आली. घटनास्थळी रुग्णवाहिका पोहोचली. तिन्ही बहिणींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं, परंतु त्यांचा मृत्यू आधीच झाला होता. ऑनलाइन गेमिंग ॲप्सचं व्यसन असलेल्या तिन्ही बहिणींबद्दल माहिती समोर आली असून त्या सतत गेम खेळत होत्या.ऑनलाइन घेीशरप ऋराश मध्ये एक टास्क देण्यात आला होता. कुटुंबातील सदस्यांच्या मते, तिन्ही मुली सुमारे एक वर्षापासून ऑनलाइन गेम खेळत होत्या. गेमच्या शेवटच्या टप्प्यात त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना शेवटच्या वेळी भेटणे आणि सर्वांचे फोटो काढणे या गोष्टींचा समावेश होता. त्यानंतर, सर्वांना एका खोलीत बंद करायचे होते. त्यानंतर, घेीशरप जपश्रळपश ऋराश मध्ये आत्महत्या करण्याचा टास्क होता, असा दावाही करण्यात येत आहे.घटनेची माहिती मिळताच एसीपींच्या नेतृत्वाखालील एक पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले. एसीपी स्वतः घटनेचा तपास करत आहेत. आर्थिक कारणांमुळे तसेच साथीच्या आजारामुळे तिन्ही मुली शाळेत जात नव्हत्या. कोरियन ऑनलाइन मोबाइल गेमच्या नमुन्यातील छायाचित्रे त्यांच्या खोलीत विखुरलेली आढळली. गेमचा अंतिम ध्येय पूर्ण केल्यानंतर हा आत्म हत्येचा प्रकार असल्याचं दिसून आलं. या प्रकरणात एक आठ पानांची सुसाईड नोटही जप्त करण्यात आली असून त्यात सॉरी पप्पा असं आणि बराच काही म जकूर लिहिलेला आढळला आहे.

## पत्नी अन प्रियकराला बोलताना पाहिलं, पतीला अपशब्द अन..

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील अम ळनेर तालुक्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पत्नीला आणि प्रियकर एकमेकांशी बाहेर बोलताना पतीने पाहिले. त्यानंतर दोघांमध्ये वाद झाला आणि पत्नी अनब प्रियकराने पतीला अपशब्द वापरल्यामुळे संतापलेल्या तथा खचलेल्या पतीने रेल्वेखाली उडी टाकून आपलं जीवन संपवल्याचा धक्कादायकअम ळनेर शहरातील सुनील श्रावण भोई (वय ३४, रा.रुबजी नगर, अमळनेर) असं मयत झालेल्या व्यक्तीचं नाव असून पत्नी व प्रियकराने पतीला अपशब्द वापरल्याने दुखावलेल्या पतीने थेट रेल्वेखाली आत्म हत्या केल्याची घटना २९ जानेवारी रोजी पहाटे अमळनेर येथे घडली.

याप्रकरणी पत्नी व तिच्या प्रियकरासह तीन जणांविरुद्ध आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रियकर अजय भोई याला पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. प्रकार समोर आला आहे.सुनील सावंत भोई याची पत्नी दिपाली भोई (वय ३०) व तिचा प्रियकर अजय छोटू भोई (वय ३२) आणि त्याची आई सुरेखा छोटू भोई अशा तीन जणांवर दाखल करण्यात आलेला आहे. आत्महत्येच्या घटनेच्या सुरुवातीला पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

सुनील याचा भाऊ सागर श्रावण भोई याने अमळनेर पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनंतर या घटनेचा उलगडा झाला.२९ जानेवारी रोजी रात्री सुनील भोई याने पत्नी व तिच्या प्रियकराला बोलताना पाहिलं. त्यानंतर झालेल्या वादात सुनीलच्याच पत्नीने आणि तिचा प्रियकर अजय याने सुनील यास अपशब्द बोलून टोमणे मारले. यावेळी अजयची आई सुरेखा भोई हिनेही अपमानास्पद वागणूक दिल्याचं फिर्यादीत नमूद करण्यात आलेलं आहे. पत्नी व प्रियकराने आपल्याला वाईट वागणूक आणि अपशब्द वापरल्यानं सुनील भोई याने रेल्वेखाली आत्महत्या केली. या घटनेनंतर सुनीलचा भाऊ यानी दुचाकीने टाकरखेडा मार्गावरील रेल्वे स्टेशन गाठून रेल्वेखाली आत्महत्या केल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झालं आहे. या घटनेत आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी वरील तिघांविरोधात भारतीय न्यायसंहिता कलम १०८, ३३३, ३५१(२)३५२व ३(५) याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बीडमध्ये दगडाने ठेचून तरुणाची हत्या

**बीड:** जिल्ह्यामध्ये गुन्हेगारीचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून, आज सोमवारी पहाटेच्या सुमारास शिरूर कासार तालुक्यातील रायम ोहा परिसरात एका ३० वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेम ुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव गुड्डू तांबोळी (वय अंदाजे ३० वर्षे, रा. रायमोहा, ता. शिरूर कासार) असे आहे. ही घटना शिरूर कासार आणि पाटोदा या दोन पोलीस ठाण्यांच्या सीमेवर असलेल्या रायमोहा गावातील डोंगर देवी शिवारात घडली. प्राथमिक अंदाजानुसार, आज सोमवारी पहाटे ३ ते ४ वाजेच्या सुमारास अज्ञात हल्लेखोरांनी गुड्डू तांबोळी यांच्यावर हल्ला केला. अत्यंत क्रूरपणे त्यांच्या डोक्यात मोठा दगड घालून त्यांची हत्या करण्यात आली.सकाळी परिसरातून जाणाऱ्या नागरिकांच्या निदर्शनास हा रक्ताने माखलेला मृतदेह आला. घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलिसांना पाचारण केले. माहिती मिळताच शिरूर कासार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा सुरू केला.

## क्लासवरुन घरी परतताना विद्यार्थिनीवर रिक्षात अत्याचार

**बीड :** स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणीने आपल्यावर चालत्या रिक्षात अत्याचार झाल्याचा बनाव रचल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. बीडच्या शिवाजीनगर पोलिसांनी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास केला असता, ही संपूर्ण कथा काल्पनिक असल्याचं समोर आलं असून यामुळे पोलीस प्रशासनाने सुटकेचा निः श्वास सोडला आहे.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी या तरुणीने तक्रार दिली होती की, दुपारी ४च्या सुमारास क्लासवरून घरी परतत असताना रिक्षा चालकानं तिला नगर रोडवरील एका निर्जन ठिकाणी नेलं. तिथे रिक्षातील एका सहप्रवाशाने तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला आणि प्रतिकार केल्यावर तिला मारहाण केली.

या गंभीर तक्रारीमुळे संपूर्ण जिल्ह्यात भीतीचं वातावरण पसरले होतं.घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर आणि त्यांच्या पथकाने तातडीने तपास सुरू केला. मात्र, तपासादरम्यान काही महत्त्वाचे मुद्दे पोलिसांच्या नजरेस आले पोलिसांनी मार्गावरील सीसीटीव्ही तपासले असता, तरुणी सांगितलेल्या वेळेत रिक्षातून थेट





आपल्या घराच्या दिशेने जाताना दिसली. तरुणीला वारंवार विचारूनही तिला नेमके घटनास्थळ सांगता येत नव्हते. पोलिसांनी १० ते १५ रिक्षा चालकांची कसून चौकशी केली, मात्र कोणताही संशयास्पद प्रकार आढळून आला नाही.

पोलिसांनी जेव्हा तरुणीला विश्वासात घेऊन विचारपूस केली, तेव्हा तिने हा प्रकार काल्पनिक असल्याचं कबूल केलं. तिने दिलेल्या जबाबानुसार 'काही दिवसांपूर्वी म ालेगाव येथील एका पाच वर्षांच्या मुलीवर झालेल्या अत्याचाराची बातमी मी वाचली होती. घरी जाताना माझ्या डोक्यात सतत तोच विचार सुरू होता. घरी गेल्यावर मी भीतीपोटी आणि भावनिक भरात घरच्यांना खोटेच सांगितलं की, माझ्यासोबत असा प्रकार घडला आहे. माझ्या रडण्यामुळे घरच्यांचा विश्वास बसला आणि प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचले'.

## बोहल्यावर चढण्यापूर्वीच पोलीस नवरदेव अचानक बेपत्ता ; धक्कादायक प्रकरण

**नांदेड :** नवरदेव वरात घेऊन वधूच्या घरी पोहचला. अंगाला हळद लागली. दुसऱ्या दिवशी दुपारी विवाह पार पडणार होता. त्यापूर्वी हळदीच्या कार्यक्रमात नवरदेवाने नवरी सोबत डीजेवर मनसोक्त डान्स देखील केला, पण लग्नाच्या काही तासांपूर्वीच भलतचं घडलं. बोहल्यावर चढण्यापूर्वीच नवरदेव बेपत्ता झाला. वधूने पाहिलेलं संसाराचं स्वप्न हे स्वप्नच राहून गेलं. एका चित्रपटातील कथेप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात ही घटना घडली आहे. विशेष म्हणजे वर आणि वधू हे दोघे पोलीस दलात कार्यरत आहेत. या प्रकरणी किनवट पोलिसांनी मीसिंगची तक्रार दाखल करत बेपत्ता झालेल्या योगेश दत्ता घुगे या नवरदेवाचा शोध सुरु केला आहे.योगेश दत्ता घुगे हा किनवट तालुक्यातील नागेशवाडी येथील रहिवासी आहे. तर मुलगी ही तालुक्यातील मदनापूर येथे राहत होती. दोघे जण विदर्भातील चंद्रपूर जिल्हा पोलीस दलात शिपाई पदी कार्यरत आहेत. वर्षभरापूर्वी दोन्ही कुटुंबांनी आपसात चर्चा करून लग्न ठरविले होते. त्यानंतर मंगळवारी सकाळी ११.५४ वाजता किनवटच्या मदनापूर येथे वधूमंडपी त्या पोलीस उपवधू-वराचा विवाह थाटात संपन्न होणार होता. सोमवारी मांडव तसेच हळदीचा कार्यक्रम पार आयोजित करण्यात आला होता.वऱ्हाड मंडळी घेऊन नवरदेव हा नवरीच्या घरी गेला. यावेळी हळदीच्या कार्यक्रमात एक वाजेपर्यंत नवरी नवरदेवाने एकत्र डान्स देखील केला. रात्री





उशिरा सर्व वऱ्हाडी झोपी गेले. इकडे लग्नघरात विवाहाची जय्यत तयारी सुरू होती, मात्र मंगळवारी पहाटे नियोजित वर बोहल्यावर चढण्यापूर्वीच बेपत्ता झाला. सकाळी नातेवाईक दत्ता कुठे आहे? असं एकमेकांना विचारणा करत होते. मात्र तो कुठे गेला हे कोणालाच माहिती नव्हतं. नातेवाईकांनी अनेक वेळा फोन लावण्याचा प्रयत्न केला. पण मोबाईल बंद येत असल्याने धाकधूक वाढली.इकडे वधूला नवरदेव बेपत्ता झाल्याची माहिती समजताच धक्का बसला. नातेवाईकांनी शोधाशोध करूनही त्याचा सुगावा न लागल्याने अखेर कुटुंबियांनी किनवट पोलीस ठाणे गाठत वर बेपत्ता झाल्याची फिर्याद दाखल केली. पोलिसांनी मि सिंगची नोंद करून बेपत्ता असलेल्या नवरदेवाचा शोध सुरू केला आहे. नवरदेव बेपत्ता होण्यामागचे कारण अद्याप समजू शकले नाही. मात्र विविध चर्चेला उधाण आलं होतं. या घटनेने किनवट तालुक्यात खळबळ उडाली आहे.

# यंग बिग्रेड अफगाणवर भारी, सेमीफायनलमध्ये दमदार विजय; वर्ल्ड कप विजयापासून एक पाऊल दूर


**झिम्बाब्वे/वृत्तसंस्था :** भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात U19 World Cup Semifinal Match रंगला. अफगाणिस्तानने या सामन्याचे नाणेफेक जिंकले आणि प्रथम बॅटिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करत अफगाणिस्तानने ३१० धावा केल्या. भारताच्या युवा संघाने हे लक्ष्य सहज गाठले आणि सामना ७ विकेट्सने जिंकला. भारतीय संघाने सेमीफायनलची मोहिम जिंकून आता फायनलमध्ये एन्ट्री मारली आहे.भारताने अंतिम फेरीत पोहोचण्याचे स्पर्धेच्या इतिहासातील सर्वोच्च लक्ष्य गाठले. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने ४ बाद ३१० धावा केल्या. फैसल शिनोजादा आणि उजैरुल्लाह नियाझाई यांनी त्यांच्या संघासाठी शतके केली. आरोन जॉर्जच्या शतक आणि Vaibhav Suryavanshi आणि कर्णधार Ayush Mhatre यांच्या जबरदस्त अर्धशतकांमुळे भारताने ८.५ षटकांत सामना लवकर जिंकलालक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली. सलामीवीर वैभव सूर्यवंशीने ३३




चेंडूत ६८ धावांची स्फोटक खेळी केली आणि पहिल्या विकेटसाठी ९० धावा जोडल्या. त्यानंतर कर्णधार आयुष म्हात्रेने ५९ चेंडूत ६२ धावा केल्या. पण सामन्याचा खरा हिरो सलामीवीर आरोन जॉर्ज होता, ज्याने शानदार खेळी करत शतक झळकावले आणि भारतीय संघाला १९ वर्षांखालील एकदिवसीय विश्वचषक नॉकआउट सामन्यांच्या इतिहासातील सर्वोच्च लक्ष्य गाठण्यास मदत केली. ६ फेब्रुवारी रोजी भारतीय संघ अंतिम फेरीत इंग्लंडशी भिडणार आहे. त्यांनी गतविजेत्या ऑस्ट्रेलियाला हरवून जेतेपदाचा सामना खेळला. भारतीय संघ २०१६ पासून सलग १९ वर्षांखालील विश्वचषक अंतिम फेरीत पोहोचत आहे. पाच वेळा विजेतेपद जिंकून आणि एकूण १० वेळा अंतिम फेरीत खेळून, ते या स्पर्धेतील सर्वात यशस्वी संघ आहेत. ३११ धावा करून, टीम इंडियाने १९ वर्षांखालील विश्वचषक इतिहासातील सर्वोच्च लक्ष्य गाठले. त्यांनी २००६ मध्ये आयर्लंडविरुद्ध न्यूझीलंडचा ३०५ धावांचा विक्रम मोडला. त्यांनी २०२४ च्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मिळवलेल्या २४५ धावांच्या स्वतःच्या मागील विक्रमाला मागे टाकत १९ वर्षांखालील विश्वचषक बाद फेरीत सर्वाधिक लक्ष्य गाठण्याचा विक्रमही केला.

# आफ्रिकेला पराभवाचा झटका, वर्ल्ड कप जिंकण्यासाठी भारत पूर्णपणे सज्ज

**नवी मुंबई/वृत्तसंस्था :** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सराव सामना रंगला. टी-२० विश्वचषकाच्या तयारीसाठी हा सामना खेळवला गेला. या पूर्वी भारताने न्यूझीलंडविरुद्ध टी-२० सामने खेळले. या मालिकेत भारतीय संघाने बाजी मारली. आता विश्वचषक सुरु होण्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक राहिले आहेत. आता आज रंगलेल्या सराव सामन्यात भारताने नाणेफेक जिंकले आणि २४० धावा केल्या. या प्रत्युतरात दक्षिण आफ्रिका फक्त २१० इतक्याच धावा करु शकले.ढ२० थीश्रव र्ऊीं २०२६ टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शेवटचा सराव सामना खेळला. नवी मुंबईतील डीवाय पाटील स्पोर्ट्स अकादमीमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात, Suryakumar Yadav नेतृत्वाखालील टीम इंडियाने ३० धावांनी विजय मिळवला. भारताकडून इशान किशन, अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा यांनी शानदार खेळी केली. भारताकडून इशान किशनने सर्वात मोठी खेळी केली, त्याने फक्त २० चेंडूत २ चौकार आणि ७ षटकारांसह ५३ धावा केल्या, त्यानंतर तो रिटायर्ट बाद झाला. त्याचा स्ट्राईक रेट २६५ होता. तिलक वर्मानेही उत्कृष्ट कामगिरी केली, त्याने १९ चेंडूत ३ चौकार आणि ३ षटकारांसह ४५ धावा केल्या. अक्षर पटेलने दुसरा डाव ३५ धावा केल्या.सामन्यात, टीम इंडियाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला, २० षटकांत ६ बाद २४० धावा केल्या. सर्व फलंदाजांनी थोडे योगदान दिले आणि एकूण



धावसंख्या चांगली झाली. स्पर्धेपूर्वी भारतीय संघासाठी हे एक सकारात्मक संकेत होते. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेकडून मार्को जॅन्सेन, कॉर्बिन बॉश, एनरिक नोर्कीया आणि क्वेना म्फाका यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत ७ बाद २१० धावाच करता आल्या. सातव्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या ट्रिस्टन स्टब्सने धमाकेदार खेळी केली आणि २१ चेंडूत एक चौकार आणि चार षटकारांसह ४५ धावा केल्या. यष्टीरक्षक-फलंदाज रायन रिकेल्टननेही २१ चेंडूत चार चौकार आणि तीन षटकारांसह ४४ धावा केल्या. त्यांचा डाव संघाला विजयी मार्गावर नेण्यात अपयशी ठरला.

# सूर्या, इशानला दिलं मोठं गिफ्ट; तर अभिषेक आणि तिलकला झटका

**मुंबई :** आयसीसी रँकिंग पुन्हा एकदा जाहीर करण्यात आली आहे. यावेळी, भारताचा स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्मा पहिल्या क्रमांकावर कायम आहे, जरी त्याच्या रेटिंगमध्ये थोडीशी घसरण झाली आहे. दरम्यान, अनेक महत्त्वपूर्ण बदल दिसून येत आहेत. भारतीय कर्णधार डीर्रूर्ज्ञीर धरवरीं आणखी एक झेप घेतली आहे. खीहरप घळीहरप खरोखरच उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ICC T20 World Cup 2026 नवीन टी२० रँकिंग जाहीर करण्यात आली आहे. अभिषेक शर्माने त्याचे नंबर वन स्थान कायम ठेवले आहे. त्याचे रेटिंग आता ९१७ वर पोहोचले आहे, जे गेल्या आठवड्यात ९२९ होते. फिल साल्ट दुसऱ्या स्थानावर आहे, ज्याने फक्त ८३४ रेटिंग गाठली आहे. भारताचा तिलक वर्मा बराच काळ तिसऱ्या क्रमांकावर होता, तो आता चौथ्या क्रमांकावर घसरला आहे. याचा अर्थ तिलक वर्मा भारत विरुद्ध न्यूझीलंड मालिकेतील पाचही सामने गमावले, त्याम




ळे न खेळण्याचे परिणाम त्याला भोगावे लागले. आता तो टी-२० विश्वचषकात टीम इंडियाकडून खेळताना दिसेल अशी अपेक्षा आहे. टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवला आपला सूर गवसला आहे. आता तो फॉर्मात आला असून धावा करण्याचा त्याला जोरदार फायदा झाला. तो आता सहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याचे रेटिंग ७२८ पर्यंत वाढले आहे. तो काही काळासाठी टॉप १० मधून बाहेर पडला होता, परंतु न्यूझीलंडविरुद्ध काही स्फोटक खेळी खेळल्यानंतर तो टॉप १० मध्ये परतला. तो लवकरच टॉप ५ मध्ये येण्याच्या अगदी जवळ आहे.इशान किशनने पुन्हा एकदा चांगली कामगिरी केली आहे.

# टी-२० विश्वचषकमध्ये धोनी करणार 'हे' खास काम ?

**मुंबई/वृत्तसंस्था :** टी-२० विश्वचषक २०२६ ची स्पर्धा आता अवघ्या दोन दिवसानंतर सुरु होणार आहे. T20 World Cup 2026 साठी भारतीय संघ सज्ज आहे. भारतीय संघाची कामगिरी टी-२० क्रिकेटमध्ये उल्लेखनीय पाहायला मिळत आहे. या विश्वचषकापूर्वी आता महेंद्र सिंग धोनीने एक महत्त्वाचे विधान केले आहे. तो टी-२० विश्वचषकात एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार की नाही याबद्दल जाणून घ्या...२०२० मध्ये भारतीय संघाचा माजी कर्णधार MS Dhoni आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला. तेव्हापासून तो फक्त आयपीएलमध्ये खेळताना दिसला आहे. निवृत्तीनंतर धोनीने कोणत्याही संघाचे प्रशिक्षकपद भूषवले नाही किंवा समालोचनातही दिसला नाही. आता,




धोनीने तो समालोचनात का दिसत नाही यावर भाष्य केले आहे. धोनीचा असा विश्वास आहे की समालोचन ही एक कला आहे आणि त्याला आकडेवारी देखील आठवत नाही, म्हणूनच तो समालोचन टाळतो. तो असा विश्वास करतो की समालोचन करताना, एखाद्याने विचारपूर्वक बोलले पाहिजे जेणेकरून कोणालाही दुखावले जाऊ नये.'धोनी अलीकडेच क्रीडा प्रसारक जतीन सप्रू यांच्याशी एका यूट्यूब संभाषणात दिसला. तो समालोचन का करत नाही या प्रश्नाचे उत्तर देताना धोनी म्हणाला, 'समालोचन करणे खूप कठीण आहे. मला वाटते की खेळाबद्दल बोलणे आणि खेळाडूंवर टीका करणे यात एक छोटी लाईन आहे. असे काही वेळा येतील जेव्हा तुम्हाला हे कळणार नाही की तुम्ही जे करत आहात ते थोडे चुकीचे असू शकते.धोनी म्हणाला, 'तुम्हाला नेहमीच खेळाबद्दल बोलायचे असते. जर तुम्हाला काही चुकीचे वाटत असेल तर तुम्ही ते उघडपणे बोलता. ते कसे म्हणायचे हे देखील एक कला आहे. तुम्हाला ती टीका अशा पद्धतीने करावी लागेल की कोणालाही असे वाटू नये की त्यांना लक्ष्य केले जात आहे. जर संघ हरत असेल तर त्यामागील कारणे काय आहेत आणि तुम्हाला ती कारणे अशा पद्धतीने स्पष्ट करावी लागतील की कोणालाही दुखावणार नाही.धोनी म्हणाला, 'भाष्य करणे ही एक कला आहे. शिवाय, जर तुम्हाला भाष्य करायचे असेल तर तुम्हाला आकडेवारीत चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे. मी आकडेवारीत चांगला नाही. असे बरेच लोक आहेत ज्यांना आकडेवारी चांगली माहित आहे, परंतु जर तुम्ही मला माझ्या स्वतःच्या आकडेवारीबद्दल विचारले तर माझे उत्तर हो असेच असेल. असे काही लोक आहेत ज्यांना केवळ भारतीय संघाचे किंवा भारतीय खेळाडूंचेच नाही तर क्रिकेट जगतातील जवळजवळ प्रत्येक खेळाडूचे आकडे देखील माहित आहेत.'

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# देवखेळ वेब सीरिजवर बंदी घालण्याची ठाकरेंच्या भास्कर जाधव यांची मागणी





**मुंबई :** प्राजक्ता माळी आणि अंकुश चौधरी यांच्या 'देवखेळ' या वेब सीरिजची चर्चा सर्वत्र आहे. या वेब सीरिजचा ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासून ही वेब सीरिज वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. कोकणवासियांनी या वेब सीरिजचा विरोध केलाय. अशातच आता शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनीही 'देवखेळ' या वेब सीरिजवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. कोकणात शिमगोत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला जातो. मुंबईतून चाकरमानी खास शिमग्याला गावी जातात. शिमग्यामध्ये पारंपारिक लोकनृत्य, खेळे असतात. घरोघरी पालखी घेऊन जातात. पालखीसोबत शंकासूराच्या वेशात असलेली माणसं जातात. याच, पार्श्वभूमीवर 'देवखेळ' ही वेब सीरिज आधारित आहे. मात्र, यामध्ये शंकासूर पापी माणसांना मारतो, असं दाखवण्यात आलं आहे. वेब सीरिजमध्ये असं चित्रण केल्यामुळे कोकणवासीयांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. म्हणूनच आमदार भास्कर जाधव , 'देवखेळ' ही वेब सीरिज तत्काळ बंद करावी, अशी मागणी केली आहे. यासंदर्भात भास्कर जाधव यांनी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी निवेदन दिलं आहे.या निवेदनात भास्कर जाधव यांनी लिहिलं की, 'कोकणातील शिमगा उत्सवातील संकासूर हे एक पारंपारिक, पौराणिक आणि भक्तीमय लोकनृत्य पात्र आहे. काळया रंगाचा पोशाख, विचित्र मुखवटा आणि हातात वेत घेवून गोमूसोबत घरोघरी फिरणारा संकासूर हा शिवाचा अवतार मानला जातो आणि गावकऱ्यांना आशीर्वाद देतो, हे आपल्याला माहितच असेल. कारण आपणसुध्दा कोकणातीलच आहात. परंतु, झी ५ या मराठी ओटीटीवर ३० जानेवारी २०२६ पासून सुरू झालेल्या 'देवखेळ' नामक वेबसीरिजमध्ये संकासूर खूनी असल्याचे दाखविण्यात आले आहे. या वेबसीरिजचे चित्रिकरण माझ्याच मतदारसंघात गुहागर तालुक्यात सुरू असून सध्या यावरून गुहागरसह संपूर्ण कोकणात प्रचंड संतापाचे वातावरण पसरले आहे. कोकणातील संकासूर हे देवाचे रूप मानले जाते. तो फक्त शिमगा उत्सवामध्ये बाहेर पडतो. संकासूराचे खेळे केवळ मनोरंजन नसून ती पूर्वापार चालत आलेली भक्ती आणि संस्कृतीची परंपरा आहे. परंतु, देवखेळ' या वेबसिरिजमध्ये संकासूराला क्रूर आणि अंधश्रध्दा पसरविणारा म्हणून दाखविण्यात आले आहे. आम्ही संकासूरावर डॉक्यूमेंट्री करत आहोत, असे ग्रामस्थांना खोटे सांगून मालिकेचे चित्रिकरण करण्यात आले. हीदेखील अत्यंत गंभीर बाब आहे. याबाबत गुहागर पोलिसांपासून जिल्हा पोलीस अधिक्षकांपर्यंत तक्रार नोंदवूनही अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने गुहागरसह कोकणातील नमन, भजन मंडळांतील कलाकारांसह सर्वसामान्य जनतेमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. काळाच्या ओघात अनेक पारंपारिक कला लोप पावत असताना कोकणात मात्र विशेष करून कुणबी समाजाने अनेक कला जिवंत ठेवल्या आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही अनेक अडीअडचणींवर मात करत त्यांनी गावागावात नमन मंडळे केवळ टिकवून ठेवली नाहीत तर ती सातासमुद्रापार पोहोचवली आहे. त्यामध्ये संकासूर देखील आहे. कोकणातील या कलांवर घाला घालण्याचे आणि त्यांना बदनाम करण्याचे काम अशा वेबसिरिजच्या माध्यमातून सुरू असल्याने संतापाची लाट उसळली आहे.'याचे पडसाद उमटून अनुचित प्रकार घडून नये म्हणून सिनेमास्टर्स प्रोडक्शन प्रा. लि. निर्मित 'देवखेळ' या वेबसिरिजवर तात्काळ बंदी घालण्यात यावी, अशी माझी आपणास विनंती आहे.' असं भास्कर जाधव यांनी शेवटी लिहिलं आहे.

## जीवलग दोस्ताच्या मृत्यूनंतर बदललं अभिनेत्याचं आयुष्य

**मुंबई :** २०२३ मध्ये मध्य प्रदेशमध्ये अनेक वेगळी घटना पाहायला मिळाली. ट्रॅफिक सिग्नलवर, महामार्गांवर आणि अरुंद शहरातील रस्त्यांवर हजारो बाईक स्कुटी चालवणारे अचानक हेल्मेट घालून दिसले. ही सरकारी योजना नव्हती, तर अभिनेता आणि गायक आकाश सिंग राजपूत यांच्या नेतृत्वाखालील वैयक्तिक संकल्पाचे परिणाम होते.२०२३ हे वर्ष आकाशसाठी फक्त एक वर्ष नव्हतं, तर एक खोल जखम होती. त्याने एका अतिशय जवळच्या मित्राला रस्ते अपघातात गमावलं. हा अपघात त्याच्यासाठी केवळ एक वैयक्तिक शोक नव्हता, तर त्याने विचार केला असता, त्याच्या मनात विचार आला की, हा मृत्यू टाळता आला असता का? आकाशने स्वतः सांगितलं की, या घटनेनं त्याला हादरवून टाकलं. आकाशने मित्राच्या अकाली मृत्यूनंतर,त्याचं दुःख शांततेत बदललं नाही, तर अभिनेत्यानं हे दुःख सामाजिक उपक्रमात रूपांतरित करण्याचा निर्णय घेतला.दुचाकीस्वारांमधील रस्ते अपघातातील मृत्यूंचं मुख्य कारण हेल्मेट न घालणं आणि वाहतूक नियमांचं उल्लंघन करणं हे आहे हे आकाशला समजलं. या विचारानं रस्ता सुरक्षा मोहिमेचा जन्म झाला, ज्याचा उद्देश केवळ शिक्षित करणंच नाही तर थेट उपाय करणं देखील होता. या मोहिमेचा एक भाग म्हणून, आकाशने सुमारे ५०,००० दुचाकीस्वारांना मोफत हेल्मेट वाटले.

## लग्नाच्या ८ वर्षांतच मोडला संसार ; घटस्फोटाबद्दल पहिल्यांदाच व्यक्त झाला इमरान खान

**मुंबई :** आमिर खानचा भाचा आणि अभिनेता इम्रान खान जवळजवळ ११ वर्षे अभिनयापासून दूर होता आणि अलीकडेच 'हॅपी पटेल' या चित्रपटात कॅमिओ करून तो पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. इम्रान खान बराच काळ अभिनयापासून दूर असला तरी, त्याचं वैयक्तिक आयुष्य अजूनही चर्चेत आहे. त्यानं अनेक चढ-उतार अनुभवले आहेत. आज, इम्रान खान सिंगल पॅरेंट आहे आणि तो आपल्या मुलीची काळजी घेतोय. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये अभिनेत्यानं घटस्फोटाबद्दल भाष्य केलंय. ईटाइम्सला दिलेल्या मुलाखतीमध्ये इम्रान खान म्हणाला, 'माझ्या घटस्फोटाच्या खूप आधी, २०१६ च्या सुमारास, मला काहीतरी चुकीचं जाणवलं. मी स्वतःला जसा समजत होतो तसं मला वाटत नव्हतं. माझं मन, शांत आहे असं मला वाटत होतं,



पण आतून, मी पूर्णपणे तुटलो होतो. जेव्हा मी हे पाहिलं तेव्हा मला जाणवलं की, मी जी प्रतिमा घेऊन जगतोय ती खरी नाही आणि मला ती बदलायची होती.'इम्रान पुढे म्हणाला की, 'आमचं रिलेशन खूप लहान वयात सुरू झालेलं आणि नात्यात काय चांगलं आणि काय वाईट आहे हे समजून घेण्यासाठी आम्हाला पुरेसा अनुभव नव्हता. जसजसा मी अधिक समजून घेऊ लागलो, तसतसं मला जाणवलं की, आम्ही अशा चक्रात अडकलो आहोत जे आपण तोडू शकत नाही. कोणताही बदल करण्यासाठी दोघांकडून प्रयत्न करावे लागतात आणि ते घडत नव्हते. मला जाणवलं की, मला या नात्यातून बाहेर पडावं लागेल.''मी कोणालाही दोष देत नाही. मी लोकांच्या नजरेतून दूर राहिलो आहे. माझ्या अनुपस्थितीत, अफवा, गप्पा आणि चर्चा पसरली आणि गोष्टी गुंतागुंतीच्या झाल्या.



## शमिताच्या आयुष्यात पुन्हा प्रेमाची बरसात ?

### राकेश बापटनंतर 'या' व्यक्तीसोबत जोडलं जातंय नाव

**मुंबई :** अभिनेत्री शमिता शेट्टी तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. अभिनेत्रीनं तिचा वाढदिवस कुटुंबासोबत साजरा केला. या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनचे फोटो व्हायरल झाले आहेत. अशातच आता टेक्नो आर्टिस्टसोबतचे फोटोही सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.टेक्नो आर्टिस्ट दीपेश शर्मांने शमिताच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनचे अनेक फोटो शेअर केले. या फोटोंमध्ये ते एकत्र पोज देताना दिसले. शिल्पा शेट्टी देखील उपस्थित होती. हे फोटो शेअर करत त्यानं कॅप्शनमध्ये त्याने लिहिलं 'वाढदिवसाच्या शुभेच्छा, तू मला नेहमीच हसवते. माझ्या सर्व गोष्टी माहित असूनही माझ्यासोबत राहणारी Love you, my Shamster या पोस्टवर शमितानं रेड हार्ट इमोजीसह 'अरे' अशी कमेंट केली आहे. मात्र, आता या पोस्टनंतर शमिता दीपेशला डेट करत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. मात्र, याबर अद्याप दीपेश किंवा शमिताने कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.शमिताचं अभिनेता राकेश बापटसोबत अफेअर होतं. राकेश आणि शमिता यांची भेट बिग बॉस ओटीटीवर झाली, पण हे नातं फार काळ टिकलं नाही. २०२२ मध्ये त्यांचा ब्रेकअप झाला. त्यानंतर तिचं नाव आमिर अलीसोबतही जोडलं गेलं. आमिर आणि शमिता यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला, ज्यामध्ये आमिर एका पार्टीबाहेर शमिताला किस करताना दिसला. पण, शमिता आणि आमिरने सांगितलं की, ते फक्त मित्र आहेत. त्याचबरोबर शमिताचं नाव मनोज बाजपेयी यांच्यासोबतही जोडलेलं. पण, मनोज आधीच विवाहित होते आणि त्यांच्या आयुष्यात सुखात होते. मात्र, नंतर मनोज बाजपेयी आणि शमिता शेट्टी यांच्या अफेअरच्या चर्चांना पूर्णविराम लागला.दरम्यान, शमिताच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं मोहब्बतें, द टॅलेंट, फरेब, कॅश, मेरे यार की शादी है, जेहर, बेवफा आणि अग्निपंख यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसली आहे. चित्रपटसृष्टीत, शमिताला तिची बहीण शिल्पा शेट्टीइतकं यश मिळालेलं नाही. शमिता शेट्टी ४७ वर्षांची असून अद्याप ती सिंगल आहे.

# शासकीय वसतिगृह, आधार आणि स्वयंम योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन; १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत

जनसंचलन/बुलढाणा

शासकीय वसतिगृहापासून वंचित राहिलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग तसेच धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत असून अर्जदार विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता १२ वी नंतर उच्च शिक्षणासाठी व्यावसायिक किंवा अव्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतला आहे, मात्र शासकीय वसतिगृहात क्षमतेअभावी प्रवेश मिळालेला नाही, असे विद्यार्थी या योजनांसाठी पात्र ठरतील. पात्रतेसाठी पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे आणि विद्यार्थ्याला किमान ६० टक्के गुण (दिव्यांगांसाठी ५० टक्के) असणे अनिवार्य आहे. तसेच अर्जदाराचे वय ३० वर्षांपेक्षा जास्त नसावे आणि तो कोणत्याही नोकरी किंवा व्यवसायात नसावा. विद्यार्थ्याचे आधार कार्ड बँक खात्याशी जोडलेले असावे आणि संबंधित शैक्षणिक संस्थेच्या शहरात तो स्थानिक रहिवासी नसावा. अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, वसतिगृहात प्रवेश न मिळाल्याचे प्रमाणपत्र, अनाथ किंवा दिव्यांग असल्यास त्याचे प्रमाणपत्र, भाड्याने राहत असल्याबाबतचे नोटरी प्रतिज्ञापत्र आणि स्वयंघोषणा पत्र ही कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्ज सादर करण्याचा कालावधी ६ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २०२६ असा असून, १६ ते २० फेब्रुवारी दरम्यान अर्जांची छाननी केली जाईल. पहिली निवड यादी २६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. गुणवत्ता आणि पात्रतेनुसार या अर्जांचा विचार स्वयंम आणि आधार योजनेसाठी केला जाईल, असे प्रशासनाने कळविले आहे.

# जिल्हा परिषद सांस्कृतिक स्पर्धा कलावंतांची स्वर्गीय अजित पवार यांना आगळीवेगळी श्रद्धांजली

जनसंचलन/बुलडाणा

जिल्हा परिषदेच्या वतीने स्थानीय जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित अधिकारी कर्मचारी यांच्या सांस्कृतिक स्पर्धांच्या पहिल्या दिवशी रात्री सहभागी कलावंतांनी शॅडो ॲक्टच्या माध्यमातून राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांना आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण केली.एकात्मिक बाल विकास सेवा योजना ग्रामीण प्रकल्प बुलढाणा यांच्या कर्मचारी कलावंत संचाच्या वतीने हे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री असताना स्व. अजित पवार यांनी राज्यात अमलबजावणी केलेल्या विविध यशस्वी योजनांचे प्रासंगिक या शॅडो एक्ट च्या माध्यमातून करण्यात आले. तसेच विमान अपघाताच्या दुर्दैवी व दुःखद घटनेचा प्रसंग सुद्धा अतिशय संवेदनशीलतेने या कलावंतांनी



उपस्थितांच्या डोळ्यासमोर उभा केला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, महिला व बालविकास विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले प्रकल्प अधिकारी, संदीप गवळी व डॉ. राधा बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सोनाली सिद्धार्थ हिवाळे यांच्या संकल्पनेतून हा शॅडो एक्ट सादर करण्यात आला. यामध्ये सुनीता चित्ते, आशा खरे, लता तायडे, शालिनी मोरे (धाड), माया मोरे (तराडखेड), वैशाली गवई (भादोला), कुसुम हिवाळे (भादोला), रुपाली वानखेडे (डोंगर खंडाळा) या मुख्य कलावंतांसह बाल कलाकार स्वराज बर्डे यांनी अभिनय केला. त्यांच्या या भावनात्मक सादरीकरणामुळे उपस्थित प्रेक्षकांचे डोळे सुद्धा पाणावले होते.

# कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीमेत १६१ संशयित कुष्ठरुग्ण आढळले...

जनसंचलन/बुलडाणा

राज्यात कुष्ठरोग निर्मूलनाच्या दिशेने प्रभावी पावले उचलत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान तसेच कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीम ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण दिन साजरा करून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, नगरपालिका दवाखाने यांच्या कार्यक्षेत्रात विशेष सर्वेक्षण सुरू आहे. यामध्ये वीटभट्ट्या, चुना भट्ट्या, गिट्टी खदानी, आश्रमशाळा, वसतिगृहे, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, कारागृहे, बालसुधारगृहे, साखर कारखाने, औद्योगिक वसाहती तसेच भटके व स्थलांतरित लोकसंख्या असलेल्या ठिकाणांचा समावेश आहे. दि. ३० जानेवारी २०२६ ते ५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील एकूण ७६८ ठिकाणी ८,९०८ नागरिकांची कुष्ठरोग तपासणी करण्यात आली. या तपासणीत १६१ संशयित कुष्ठरुग्णांची नोंद झाली असून, त्यापैकी नवीन ३ रुग्णांचे निदान निश्चित करून उपचार सुरू करण्यात आले आहेत. ही विशेष सर्व्हेक्षण मोहीम दि. १३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, कुष्ठरोगाची तपासणी करून घ्यावी तसेच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. हरी पवार, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठ), बुलढाणा यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वर सामाजिक समता, नटराज, विश्वकर्मा व क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

: इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत सन २०२५२६ या वर्षासाठी महात्मा बसवेश्वर सामाजिक समता (शिवा) पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार तसेच क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्कारांसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कलात्मक समाजप्रबोधन, साहित्यिक कार्य, समाजसेवा तसेच सामाजिक संघटनात्मक कार्य करणारे कलावंत, साहित्यिक, समाजप्रबोधनकार, समाजसेवक व संबंधित सामाजिक संस्थांसाठी हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. समाजासाठी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक प्रबोधन तसेच आर्थिक कल्याणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंत समाजसेवक, कलावंत, समाज संघटनात्मक कार्यकर्ते, अध्यात्मिक प्रबोधनकार, साहित्यिक व सामाजिक संस्थांना सन २०२५२६ या वर्षासाठी हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्कारासाठी पुरुष अर्जदारांची किमान वयोमर्यादा ५० वर्षे तर महिलांसाठी किमान ४० वर्षे निश्चित करण्यात आली आहे. तसेच सामाजिक संस्थांनी संबंधित क्षेत्रात किमान १० वर्षे कार्य केलेले असणे आवश्यक आहे. इच्छुक व पात्र व्यक्ती व संस्थांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पुरस्कारासाठीचे प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, बुलढाणा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, त्रिशरण चौक, चिखली रोड, बुलढाणा येथे सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बुलढाणा मा. श्री. मनोज मेरत यांनी केले आहे.

# अमृत संस्थेच्या ड्रोन प्रशिक्षणाची कीर्ती गोव्यापर्यंत गोवा सरकारच्या ३० अधिकाऱ्यांना अमृत ड्रोन मिशन अंतर्गत प्रशिक्षण

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत संस्थेकडून राबवण्यात येणाऱ्या दर्जेदार ड्रोन प्रशिक्षण कार्यक्रमाची कीर्ती आता महाराष्ट्राच्या सीमाही ओलांडून थेट गोव्यापर्यंत पोहोचली आहे. गोवा सरकारने आपल्या ३० अधिकाऱ्यांना ड्रोन पायलट प्रशिक्षण देण्यासाठी अमृत संस्थेची निवड केली असून, यासंदर्भातील प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे. अमृत ही संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी विविध कौशल्यविकास व उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबवते. त्याचाच एक भाग म्हणून ङ्गअमृत ड्रोन मिशनफ ही मोहीम सुरु करण्यात आली असून, ड्रोन पायलट बनण्यासाठीचे हे प्रशिक्षण लक्षित घटकांसाठी पूर्णतः मोफत आहे. आतापर्यंत या प्रशिक्षणाचा लाभ १०० हून अधिक लाभार्थ्यांनी घेतला असून, अनेकांनी या कौशल्याच्या आधारे शेती फवारणी, सर्व्हे, व्हिडिओग्राफी, फोटोग्राफी तसेच विविध सरकारी प्रकल्पांच्या निरीक्षणाच्या कामातून चांगली कमाई सुरू केली आहे. सध्या राज्यातील आठ ठिकाणी अमृत संस्थेमार्फत ड्रोन प्रशिक्षण दिले जाते. ड्रोन तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज ओळखून अमृत संस्थेने हे मिशन सुरू केले. याच प्रशिक्षणाच्या गुणवत्तेने प्रभावित होऊन गोवा सरकारच्या नियोजन, सांख्यिकी व मूल्यांकन संचालनालयाचे संचालक विजय सक्सेना यांनी अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना पत्र पाठवून प्रशिक्षणाबाबतची मंजुरी कळवली आहे. पत्रात सक्सेना यांनी नमूद केले आहे की, अमृत ड्रोन मिशनअंतर्गत तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम अत्यंत उच्च दर्जाचा असून, प्रशिक्षक अनुभवी व सक्षम आहेत. गोवा सरकारच्या ३० अधिकाऱ्यांना ङ्गस्मॉल रिमोट पायलट सर्टिफिकेट ()फ प्रशिक्षण देण्यासाठी अमृत संस्थेला मंजुरी देण्यात येत आहे.फ्फ दरम्यान, या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाचा लाभ राज्यातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली आज महाराष्ट्रातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची बैठक

## आरोग्य सेवा सहज आणि सुलभ बनविण्यासाठी उपाययोजना करा अधिकाऱ्यांच्या बैठकीत केल्या सुचना.

जनसंचलन/ संग्रामपूर

गोरगरीब जनतेला केंद्रबिंदु मानुन प्रत्येक व्यक्तीला उत्तमातील उत्तम आरोग्य सेवा मिळावी या दृष्टीकोनातुन आरोग्य सेवा सहज, सुलभ आणि सक्षम बनविण्याच्या दृष्टीकोनातुन कार्यप्रणाली अमंलात आणा अशा सुचना केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केल्या आहेत. आयुष मंत्रालय, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय नवी दिल्ली आणि महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आज नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये प्रत्येक नागरीकांना दर्जेदार वैद्यकिय सुविधा पोहचविणे आयुष उपचार पध्दतीचा विस्तार करणे आणि आरोग्य सेवा मजबुत करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये बोलतांना केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी संबधित अधिकाऱ्यांना सुचना केल्या. यावेळी बोलतांना ते म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टी नेतृत्वाखाली आम्ही ङ्गङ्घस्वस्थ्य भारत, सशक्त भारतङ्घङ्घ या संकल्पनेतुन निरोगी महाराष्ट्रासाठी आणि विकसीत भारतासाठी वास्तवात सहज आणि सुलभ आणि सक्षम आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्यमंत्री जे.पी.नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहोत. वैद्यकिय क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी सुध्दा शासनाच्या विविध योजना तळागळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी स्वयंस्फुर्तीने काम करणे गरजेचे असल्याचे मतही केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या बैठकीत व्यक्त केले. या बैठकी दरम्यान राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम, क्षयरोग, किटकजन्य आजार, आयुष आरोग्य मंदिर, आयुष ग्राम यासारख्या योजनांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला आरोग्य मंत्रालयाचे संयुक्त सचिव, श्री.निपुल विनायक, सचिव आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य, डॉ.भारती बलकवडे, आयुक्त, राष्ट्रीय आरोग्य अभियान, डॉ. नितीन अंबाळेकर, संचालक, आरोग्य सेवा, डॉ. रमण घुमराळेकर संचालक आयुष विभाग महाराष्ट्र राज्य व मंत्रालयीन उच्चस्तरीय अधिकारी उपस्थित होते.



# क्षयरोगाविरुद्ध आमदार खरातांचा दमदार पुढाकार; १०३ रुग्णांना निक्षय मित्र म्हणून आधार!




जनसंचलन/मेहकर

क्षयरोग निर्मूलनासाठी सामाजिक सहभागाची गरज अधोरेखित करत मेहकर-लोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी निक्षय मित्रफ म्हणून पुढाकार घेत १०३ क्षयरुग्णांचे पालकत्व स्वीकारले आहे. संसर्गजन्य आजारांमध्ये क्षयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण चिंताजनक असून, उपचारासोबत पोषण आहार मिळाल्यास रुग्ण बरे होण्याचा वेग वाढतो, हे लक्षात घेऊन त्यांनी ही जबाबदारी उचलली. केंद्र शासनाच्या निक्षय योजनेअंतर्गत प्रौढ रुग्णांना गहू, डाळ, गोडेतेल व दुध पावडर तर बाल रुग्णांसाठी विशेष पोषण साहित्य देण्याची तरतूद आहे. जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत तब्बल १६८२ क्षयरुग्ण उपचार घेत असून, त्यापैकी मेहकर मतदारसंघातील १०३ रुग्णांना आता नियमित पोषण आहार मिळणार आहे. या उपक्रमामुळे रुग्णांना केवळ आरोग्य सहाय्यच नव्हे तर सामाजिक आधारही मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. कार्यक्रमावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विजय बलकार यांनी आमदार खरात यांचा मी निक्षय मित्र फ्रेम देऊन सत्कार केला.

# चिखलीत संत नरहरी महाराज पुण्यतिथीला भक्तीचा जल्लोष सुवर्णकार समाजाची नवी कार्यकारिणी जाहीर



जनसंचलन/ चिखली

सोनार समाजाचे आराध्यदैवत संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७४० व्या पुण्यतिथीनिमित्त चिखलीतील सोनार समाज मंदिर भक्ती, उत्साह आणि एकतेच्या घोषणांनी अक्षरशः दुमदुमून गेले. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात समाज बांधवांची उसळलेली गर्दी लक्षवेधी ठरली. अनिकेत लोळगे व सौ. अनुराधा लोळगे यांच्या हस्ते प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दीपप्रज्वलन, पुष्पहार अर्पण आणि सामूहिक महाआरतीदरम्यान नरहरी सोनार महाराज की जय च्या जयघोषाने परिसर भारावून गेला. या मंगल प्रसंगी चिखली सुवर्णकार समाजाची नूतन कार्यकारिणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी भिकू लोळगे, उपाध्यक्षपदी दीपक काळे, सचिव सुनील डहाळे, कोषाध्यक्ष संतोष डहाळे व सहसचिव समीर दहिवाळ यांच्यासह सदस्यांची निवड झाली. नव्या पदाधिकाऱ्यांनी समाजहिताचे उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त करताच उपस्थितांकडून टाळ्यांचा कडकडाट झाला.

# देऊळगाव महीत मध्यरात्री धाडसी घरफोडी; माजी सैनिकांच्या घरावर चोरट्यांचा डल्ला, साडेपाच तोळे सोनं लंपास!

जनसंचलन/ देऊळगाव मही

सोन्याचे दर गगनाला भिडले असतानाच देऊळगाव महीत चोरट्यांनी धाडसी घरफोडी करत शहरातील सुरक्षिततेचा फज्जा उडवला आहे. ४ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री सुमारे १.३० वाजताच्या सुमारास अंधाराचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी माजी सैनिकांच्या घरावर थेट डल्ला मारला. वार्ड क्रमांक ६ मधील रहिवासी माजी सैनिक रघुनाथ माधव मुजमुले (वय ४९) यांच्या घराचा हॉलचा दरवाजा बाहेरून दोरीने बांधून चोरट्यांनी बेडरूममध्ये प्रवेश केला. बेडरूममधील कपाटाचे कुलूप तोडून साडेपाच तोळे सोन्याचे दागदागिने, अंदाजे २ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला आणि घराच्या पाठीमागील बाजूने पसार झाले. या घटनेने देऊळगाव मही शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. बुलढाणा येथील श्वान पथक व फॉरेन्सिक तज्ज्ञांना पाचारण करून तपास करण्यात आला. या गंभीर चोरी प्रकरणाचा पुढील तपास देऊळगाव राजा ठाणेदार ब्रह्मागिरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस चौकीचे इन्चार्ज



कलीम देशमुख व पोहेकॉ शरद साळवे करत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८